महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल)
नियम १९६१
आकस्मिकता उद्‌भवणा-या २३ गंभीर
आजारावर तसेच ५ गंभीर आजारावर
खाजगी रुग्णालयांत विशिष्टोपचारावरील
वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती
...... सुधारित वेतनगट आणि दराबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय,क्रमांक एमएजी-१०९९/प्र.क्र.४०/आरोग्य-३
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक: २९ जुलै,१९९९

वाचा:-
१) शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी १०८१/४९०७/आ.९,दिनांक १९ ऑक्टोबर १९८३.
२) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक- एमएजी १०८४/४१५७/ सीआर १५६/आरोग्य-९, दिनांक २९ एप्रिल,१९८५.
३) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक- एमएजी-१०८६/४९०७/आरोग्य-९, दिनांक २३.६.८८
४) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक-एमएजी-१०८८/३८३७/आरोग्य-९, दिनांक २३.१.८९.
५) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक- एमएजी-१०८९/६०८/आरोग्य-९, दिनांक १२ ऑक्टोबर,८९.
६) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक- एमएजी-१०९१/२५६५/ सीआर-२११/आरोग्य-७, दिनांक १७ फेब्रुवारी,१९९२
७) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक- एमएजी-१०९२/१६९२/ सीआर-२३३/९२/आरोग्य-७, दिनांक १९.१२.९२
८) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक- एमएजी-१०९१/३४५६/ सीआर-३२०/९१/आरोग्य-७, दिनांक १४.१.९३
९) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक- एमएजी-१०९१/२५२०/ (सीआर-२२१/९१)/आरोग्य-७, दिनांक २४.२.९३.

**प्रस्तावना:-** शासकिय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुदींच्या अधिन राहून, शासन विनिर्दिष्ट आकस्मिकता उद्‌भवणा-या २३ आजारावर खाजगी रुग्णालयात केलेल्या उपचारावरील वैद्यकिय खर्चाची, वेतन गटानुसार अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या टक्केवारीप्रमाणे परंतु प्रत्येक प्रकरणी रु.२०,०००/- च्या कमाल मर्यादित प्रतिपूर्ती केली जाते. अशा प्रकरणी झालेल्या वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती करताना शस्त्रक्रिया, चाचण्या, औषधोपचारार्थ केलेल्या खर्चाची वेतन गटासाठी अनुज्ञेय ठरविलेल्या टक्केवारीनुसार परिगणना होत असली, तरी रुग्णालयात रहाण्याचा खर्च परिगणित करताना वेगळी पध्दत अवलंबिली जाते.

वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याच्या सध्याच्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रामुख्याने खालील चार प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होते.



रत्नागिरी.
16 AUG 1999

१) पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणीच्या अनुषंगाने मासिक मूळ वेतन गट निश्चित करणे.
२) रुग्णालयीन वास्तव्याचा खर्च परिगणित करण्याची सद्या अस्तित्वात असलेली काहीशी क्लिष्ट प्रध्दत सोपी करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करुन, परिगणनेची नवीन पध्दत अस्तित्वात आणणे.
३) रुग्णालयीन वास्तव्यावरील खर्चाची परिगणना करण्यासंदर्भातील नविन पध्दत १) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे, २) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया, ३) ॲन्जिओप्लास्टो शस्त्रक्रिया, ४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया, ५) रक्ताचा कर्करोग या पाच गंभीर आजारावरील विशिष्टोपचाराच्या प्रकरणी देखिल अमलांत आणणे.
४) अति दक्षता कक्षावरील (आय.सी.यु.कक्ष) सद्या अनुज्ञेय नसलेला खर्च अनुज्ञेय ठरवून त्या कक्षातील वास्तव्यावरील खर्चाचा परिगणना करतांना अंतर्भाव करणे.

उपरोक्त सर्व मुद्दे विचारात घेऊन पूर्वीचे हयां संदर्भातील आदेश रद्द करुन विनिर्दिष्ट २३ आकस्मिक आजार व वर नमूद केलेल्या ५ गंभीर आजारावरील विशिष्टोपचारासाठी वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती करतांना सुधारित मासिक मूळ वेतन गट निश्चित करुन रुग्णालयातील वास्तव्यावरील व अति दक्षता कक्षावरील खर्चाची परिगणना करण्याची नवीन पध्दत अमलांत आणण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :** उपरोक्त वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व परिगणनेची नवीन पध्दत अमलात आणण्यासाठी सद्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीसंबंधीचे शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक :एमएजी १०८९/६०८/आरोग्य-९,दिनांक १२ ऑक्टोबर १९८९ अंशत: व शासन निर्णय, क्रमांक : एमएजी १०९१/२५६५/सीआर २११/ आरोग्य-७,दिनांक १७ फेब्रुवारी,१९९२ या शासन निर्णयान्वये पूर्णत: रद्द करण्यात येत आहे.

पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दि.१ जानेवारी,१९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या आहेत. परिणामी, शासन विनिर्दिष्ट २३ आकस्मिक आजारांवर खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण कालावधीतील औषधोपचारांसाठी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती आता पुढील सुधारित मासिक मूळ वेतन गटानुसार अनुज्ञेय ठरेल.

तक्ता "अ"

| अ.क्र. | पूर्वीचे मासिक मूळ वेतन | सुधारित मासिक मूळ वेतन | औषधोपचारावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम |
|---|---|---|---|
| १) | रु.२८००/- पर्यंत | रु.८४००/- पर्यंत | औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के. |
| २) | रु.२८०१/- ते रु.३५००/- पर्यंत | रु.८४०१ ते रु.१०,५००/- पर्यंत. | प्रत्यक्ष खर्चाच्या ८५ टक्के. |
| ३) | रु.३५०१/- व त्यापेक्षा जास्त | रु.१०,५०१/- व त्यापेक्षा जास्त. | प्रत्यक्ष खर्चाच्या ८० टक्के. |

वरील प्रकरणी शासन मान्य तसेच खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा खर्च संबंधित कर्मचाऱ्याचा वेतनगट लक्षात न घेता, खाली दर्शविल्याप्रमाणे त्याने प्रत्यक्ष वास्तव्य केलेल्या कक्षाच्या प्रकारासमोर विहीत केलेल्या मर्यादेत अनुज्ञेय ठरेल.

तक्ता "ब"

| अ.क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती करावयाची रक्कम |
|---|---|---|
| १) | जनरल (सर्व सामान्य कक्ष) वॉर्ड | वेतनाच्या टप्प्याप्रमाणे ९० टक्के, ८५ टक्के व ८० टक्के |
| २) | जनरल वॉर्डच्या (सर्वसामान्य कक्षाच्या) बाजूचा बाथरुम नसलेला कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ७५ टक्के |
| ३) | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६५ टक्के |
| ४) | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६० टक्के |
| ५) | बाथरुमसह वातानुकुलित कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| ६) | अतिदक्षता कक्ष (आय.सी.यु.कक्ष) | प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |

२. प्रस्तावनेत नमूद केलेल्या ५ गंभीर आजारांवर, शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास तेथील आंतररुग्ण कालावधीतील औषधोपचारावरील खर्चाची १०० टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. तसेच या ५ गंभीर आजारावर चिकित्सोपचारसाठी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करतांना सध्या अनुज्ञेय नसलेल्या अतिदक्षता कक्षावरील (रिकव्हरी रुम) संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच या ५ गंभीर आजारासाठी अतिदक्षता कक्षात असतांना रुग्णाच्या नांवावर असलेल्या पूर्वीचा कक्ष देखील उपरोक्त "ब" तक्त्यातील दर्शविलेल्या आकारानुसार अनुज्ञेय राहील.

काही खाजगी रुग्णालयामध्ये वास्तव्याचे प्रकार दर्शविण्यासाठी वेगवेगळया शब्दाचा वापर केला जातो. (उदा:- ए,ए-१,बी,स्पेशल,डिलक्स इत्यादि.) या सांकेतिक शब्द प्रयोगामुळे वास्तव्यासाठी नेमक्या कोणत्या सुविधा दिल्या जातात याचा बोध होत नांही अशावेळी रुग्णाचे वास्तव्य वर विहीत केलेल्या वास्तव्याच्या कोणत्या प्रकारात होते वा कोणत्या प्रकाराशी समकक्ष होते, याबाबतचे संबंधीत खाजगी रुग्णालयाच्या प्राधिकृत वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र उपलब्ध करणे अत्यावश्यक राहील व ती जबाबदारी संबंधित शासकिय कर्मचा-याची राहील.

हे आदेश, शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून अमलात येतील. परंतु दिनांक १.१.९६ ते या आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत औषधोपचार घेतलेल्या अनिर्णित प्रकरणांना, हे आदेश लागू राहतील. मात्र निर्णित प्रकरणे पुनः उघडून कार्यवाही करण्यात येऊ नये.

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग कमांक: एमएजी-१०८१/४९०७/आ-९, दिनांक १३ ऑक्टोबर,१९८३ व शासन निर्णय क्र.एएमजी-१०८४/४१५७/सीआर-१५६/आरोग्य-९,दिनांक २९ एप्रिल,१९८५ च्या आदेशांतील उर्वरित तरतूदी त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांसहीत यापुढेही चालू राहतील.

सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागानी हा शासन निर्णय, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळविण्याची व्यवस्था करावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक वैप्र-२०२/सेवा-५,दिनांक २८ जुलै, १९९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानसुार व नावाने,

(प्रीतम आठवले)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रति